पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **२२/०१/२०२०** वेळ - दुपारी **१२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **२२/०१/२०२०** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३. मा. सुनिता हेमंत तापकीर
४. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
५. मा.बाबर शर्मिला राजू
६. मा.कोकणे संतोष अंकुश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) जागा बदलास मान्यता मिळणेबाबत. – मा.कैलास बारणे , मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०८/०१/२०२०** (कार्यपत्रिका क्रमांक **१२**) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०८/०१/२०२०

सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

मा.कैलास बारणे , मा.शर्मिला बाबर यांनी प्रस्तावित केलेनुसार निविदा क्र.५३/०२/२०१८-१९ र.रु.२,३६,९४,३४५/- BSUP प्रकल्प विभागाकडून काढण्यात आलेली आहे. मंजूर विकास आराखडयानुसार ३० मी.डी.पी रस्ता महात्मा फुले नगर झोपडपट्टी दापोडी मधून

जात आहे. प्रस्तावात नमूद निवेदेमधून सदर रस्ता विकसित करणेकामी रस्त्याने बाधित होणा-या झोपडया दापोडी येथील आरक्षण क्र.३/५ खेळाचे मैदान येथे पत्राशेड तयार करुन त्या जागेवर स्थलांतरित करावयाचे होते. तथापि सदर प्रसतावास बांधकाम परवानगी नाकारल्याने काम करता येवू शकले नाही. सद्यस्थितीत महात्मा फुले नगर झोपडपट्टीने बाधित क्षेत्रावर १८ मी. रुंदीचा रस्ता करावयाचा असल्याने स.नं.८५ पै मधील उर्वरित १२ मी. रस्त्याच्या जागेवर डी.पी रस्त्याने बाधित झोपडी धारकांसाठी पत्राशेड तयार करुन तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरित करावयाचे आहे. तरी प्रस्तावात नमूद केलेनुसार निविदेमधील कामाकरिता मुळ जागेमध्ये बदल करुन पत्राशेड तयार करणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **राजेंद्र किसनराव लांडगे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३९/२०२०
दिनांक : २२/०१/२०२०

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.